*Indian Streams Reserach Journal*
*Vol.2,Issue.II/ March; 12pp.1-4* *दामोधर राऊत* **ISSN:-2230-7850**

**Research Papers**

# *भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्राचा इतिहास*

***दामोधर राऊत***
ग्रंथपाल
सर्वोदय महाविद्यालय,
सिंदेवाही, जि. चंद्रपुर

## *प्रस्तावना :—*

भारतात फार पूर्वीपासून ग्रंथालये अस्तित्वात होती असे पुरावे इतिहासात सापडतात. राजे महाराजे, संस्थानिक आणि धर्मगुरू यांना ग्रंथसंग्रहाचे, ज्ञानाच्या प्रसाराचे महत्व पटले होते असे दिसते. परंतु ज्ञान ही ठराविक लोकांची मक्तेदारी होती. जरी ते ग्रंथ अभ्यासकांना उपलब्ध करून देत असले तरी अशीच परंपरा इतिहास दर्शवितो. पण त्याकाळी ग्रंथालयशास्त्र म्हणून, ग्रंथपालन हा एक व्यवसाय म्हणून त्याकडे पाहिले जात नव्हते. यासाठी सखोल अभ्यास वा निश्चित अशी नियमावली नव्हती. यासाठी काही शास्त्रशुध्द अभ्यासाची गरज डॉ. एस. आर. रंगनाथन यांनी ओळखली. म्हणून त्यांना भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक असेही म्हणतात.

## *इतिहास :*

भारताच्या इतिहासात नालंदा, तक्षशिला, उदंतपुरी इ. ग्रंथालयांचा उल्लेख आढळतो. श्री. मेलविल डयुई यांनी अमेरीकेत इ. स. 1887 मध्ये ग्रंथपालाचा अभ्यासक्रम सुरू केला होता. भारतात ग्रंथपालनाचा अभ्यासक्रम सुरू करण्याचा बहुमान बडोदा संस्थानकडे जातो. स्वातंत्र्यापूर्वी इ.स. 1911 मध्ये श्रीमंत सयाजीराव गायकवाडांनी अमेरिकेहून श्री. डब्लु.सी. बॉर्डन या तज्ञाला नवीन ग्रंथालये स्थापण्यासाठी बोलावून घेतले. इ.स. 1913 मध्ये ग्रंथपालनाचा अभ्यासक्रम नागरी ग्रंथपालनासाठी सुरू केला. इंपीरियल लायब्ररी कलकत्ता याचा पहिला ग्रंथपाल जॉन मॅक्फरलेन यांना सेवांतर्गत ग्रंथपालन अभ्यासक्रमात रूची होती. इ. स. 1995 मध्ये पंजाब विद्यापीठात श्री. ए.डि. डिफेनसन या अमेरिकन ग्रंथपालाने प्रशिक्षणाचे कार्यक्रम व्यवस्थित चालविले होते. तेच विद्यापीठ अभ्यासक्रम होय. विद्यार्थ्यांसाठी श्द पंजाब लायब्ररी प्रायमरश नावाची हस्तपुस्तिका तयार केली होती.

आंध्रप्रदेश लायब्ररी फाऊंडेशनने विजयवाडा येथे 1920 साली ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांकरीता तर म्हैसुर संस्थानात एम. विश्वेश्वर अय्यर यांच्या पुढाकाराने बंगलोरमध्ये ग्रंथपालासाठी प्रशिक्षणाचे वर्ग ग्रंथालय विकास कार्यक्रमाखाली आरेखित केले होते.

इ.स. 1928 मध्ये मद्रास लायब्ररी असोसिएशनने श्समर स्कुलश हा कार्यक्रम महाविद्यालयीन ग्रंथपालांसाठी आयोजित केला होता. 1929 मध्ये ग्रंथालय शास्त्राचा प्रमाणपत्र कार्यक्रम सुरू केला. आंध्र विद्यापीठाने देखील ग्रंथालयशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला होता. 1931 मध्ये मद्रास लायब्ररी असोसिएशन कार्यक्रम उचलून धरून त्याला नियमित अभ्यासक्रमाचे स्वरूप दिले.

इ.स. 1935 मध्ये बेंगाल लायब्ररी असोसिएशनने श्रीकुमार मुनिंद्र देव रॉय यांच्या पुढाकाराने बनसेबरीया येथे लायब्ररी ट्रेनिंग कॅम्पची व्यवस्था केली होती. याच काळात इंपीरियल लायब्ररी कलकत्ता येथील ग्रंथपाल श्री. असदुल्लाह यांनी ग्रंथपालनाच्या शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू केले होते. 1935 मध्येच मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री. एस.आर. रंगनाथन यांनी पदव्युत्तर पदवी अभ्यास सुरू करण्याविषयीच्या योजनेला व्यवस्थापनाकडून नकार प्राप्त झाला. इ.स. 1937 मध्ये मद्रास विद्यापीठाने एक वर्श कालावधीचा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू केला. याच प्रकारचा अभ्यासक्रम इ.स. 1942 मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाने व इ. स. 1943 मध्ये मुंबई विद्यापीठाने सुरू केला होता.

दिल्ली विद्यापीठाच्या कुलगुरूंनी 1947 मध्ये डॉ. एस.आर. रंगनाथन यांना बोलावून घेतले. 1947 ते 1955 या काळात मानद प्राध्यापक म्हणून त्यांनी काम केले. 1948 मध्ये दिल्ली विद्यापीठाने पदव्युत्तर पदविका/पदवी अभ्यासक्रम चालू केले. ग्रंथालय शास्त्राचा स्वतंत्र विभाग निर्माण करून तेथे पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम दोन वर्षाकरीता चालू केले. पुढे याचे रूपांतर ग्रंथालय विशारद (B. Lib.) मध्ये झाले.

1953 मध्ये गव्हर्नमेंट ऑफ इंडिया लायब्ररीज असोसिएशनने पुढाकार घेऊन सरकारी ग्रंथालयात काम करणाऱ्या

**Please cite this Article as:** ***दामोधर राऊत ,भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्राचा इतिहास* : Indian Streams Research Journal (March ; 2012)**

Indian Streams Reserach Journal
Vol.2,Issue.II/ March; 12pp.1-4

कर्मचाऱ्यांकरीता सेवांतर्गत प्रशिक्षण अभ्यासक्रम चालू केला. हा अभ्यासक्रम विद्यापीठ अभ्यासक्रमाशी समान होता. 1959 मध्ये सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल यांना प्रशिक्षण देणे, अध्यापन साहित्य निर्माण करणे या उद्देशाने केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या अनुदानाने 'ॲन इन्स्टिटयुट ऑफ लायब्ररी सायन्स' ची दिल्ली विद्यापीठात स्थापना झाली.

1957 मध्ये अलीगढ विद्यापीठाने सर्वात प्रथम ग्रंथालय विशारद अभ्यासक्रम चालू केला. पुणे ग्रंथालय संघाने 1947 पासून ग्रंथपालनाचे प्रमाणपत्र शिक्षण मराठीतून देण्याचा उपक्रम सुरू केला. मराठी माध्यमातील अभ्यासक्रम उपयुक्त व्हावा यासाठी मराठीतून वर्गीकरण, तालिकीकरण, संदर्भसेवा या विशयाची पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत. डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी इंडियन स्टॅटिस्टीकल इन्स्टिटयुट कलकत्ता यांच्या मदतीने डॉक्यमेंटेशन रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग सेंटर सुरू केले. हा दोन वर्षाच्या कार्यक्रमात रूपांतरीत झाला आहे. इन्सडॉक या संस्थेने प्रलेखाकारांसाठी अभ्यासक्रम सुरु केला होता. कालांतराने त्यात बदल होत गेले. आज 'कोर्स इन इनफरमेशन सायन्स' नावाने प्रचलित आहे.

अनेक विद्यापीठातून ग्रंथालय व माहितीशास्त्र विशारद हा एक वर्ष कालावधीचा अभ्यासक्रम सुरू केलेला आहे. मुक्त विद्यापीठा अंतर्गत देखील हा अभ्यासक्रम राबविला जातो.

1960 पर्यंत फक्त मुंबई, दिल्ली आणि बनारस ही तिनच विद्यापीठे होती. आज चाळीस विद्यापीठे व चौरेचाळीस संस्था अभ्यासक्रम चालवित आहेत.

सेन समितीने सुचविलेल्या अभ्यासक्रमानुसार एम.फिल. अभ्यासक्रम अनेक विद्यापीठांच्या शाखांतून सुरू केला. 1980 मध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्र अभ्यासक्रमातील एम.फिल. ही पदवी प्रथम दिल्ली विद्यापीठाने दिली. आज पाच विद्यापीठे हा अभ्यासक्रम चालवितात.

इ.स. 1951 मध्ये दिल्ली विद्यापीठाने ग्रंथालय व माहितीशास्त्र वाचस्पती ही पदवी देण्यास सुरूवात केली. इ.स. 1958 मध्ये डॉ. बी.बी. कृष्णराव हे दिल्ली विद्यापीठात पहिले ग्रंथालय व माहितीशास्त्र वाचस्पती हा मान मिळविणारे होते. आज तीस विद्यापीठातून हा कार्यक्रम राबविला जातो.

1958 पर्यंत ग्रंथालय शास्त्राच्या अभ्यासक्रमासंबंधित काही ठराविक प्रमाणके दिसत नाही. 1961 च्या रिव्हयु कमिटी ऑन लायब्ररी सायन्सच्या अहवालात प्रथमच ग्रंथालय व माहितीशास्त्र संबंधीचा विस्तृत आराखडा दिला आहे. हा अहवाल श्लायब्ररी सायन्स इन इंडियन युनिव्हरसिटीज' या शीर्षकाने 1965 साली विद्यापीठ अनुदान मंडळाने प्रसिध्द केला. या अहवालात ग्रंथालयशास्त्र विभागाची व विविध अभ्यासक्रमाची कार्ये सविस्तर सांगितली आहेत. संशोधन, ग्रंथासाठी अनुदान, शिक्षकांचे प्रशिक्षण, विद्यापीठीय ग्रंथालय व विभाग यांचे सहकार्य असे काही महत्वाचे मुद्दे सुचविले आहेत.

दिल्ली विद्यापीठाच्या ग्रंथालयशास्त्र विभागाने 1973 मध्ये ग्रंथालयशास्त्राच्या अध्यापन पध्दती व त्यांचे मूल्यमापन या विशया संदर्भात एक वर्कशॉप आयोजित केले होते. 1977 मध्ये भारतातील ग्रंथालयशास्त्र शिक्षण या विशयावर एक चर्चासत्र विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वतीने आयोजित केले होते. या चर्चासत्रात दोन वर्श कालावधीचा ग्रंथालय निश्णात अभ्यासक्रम प्रायोगिक तत्वावर विद्यापीठाकडून चालविणे, विद्यापीठातील ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागांना संपूर्ण विभागाचा स्वतंत्र दर्जा देणे, पूर्ण वेळ अध्यापक, कर्मचारी व पूर्ण वेळ मुख्य ग्रंथपाल नेमणे. माहिती शास्त्रातील नवनविन क्षेत्रांची ओळख करून घेणे. त्यानुसार अभ्यासक्रमात योग्य ते बदल करणे. एम.फिल. व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र वाचस्पती यासारखे संशोधनात्मक कार्यक्रम कार्यान्वित करणे, समाजाच्या गरजांशी संबंधित असलेले शैक्षणिक कार्यक्रम आखणे, अध्यापनाची गुणवत्ता वाढविणे या गोष्टी सुचविल्या आहेत.

इ.स. 1970 च्या दरम्यान अनेक ग्रंथालय विभागांनी नविन तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. माहितीचा साठा, प्रतिप्राप्ती, संगणकाचा वापर इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव अभ्यासक्रमात केला गेला. शैक्षणिक कार्यक्रमाची गुणवत्ता वाढविण्यासाठी काही मार्गदर्शक तत्वे, प्रमाणके आखली गेली. निरंतर शिक्षणासाठी अधिक मदत दिली.

ग्रंथालय विभागामध्ये सहकार्याची सूचना दिली. ग्रंथालयाची जागा व आर्थिक अंदाजपत्रक याबाबत सविस्तर गोष्टी गटाने सुचविल्या.

### *ग्रंथालय व माहिती पध्दतीचे राष्ट्रीय धोरण :*

इ.स. 1985 साली राजाराम मोहन लायब्ररी फाऊंडेशन आणि इंडियन लायब्ररी असोसिएशन यांनी राष्ट्रीय ग्रंथालय आणि माहिती या विषयी दोन वेगवेगळया योजनांचा आराखडा तयार केला. या दोन्हींमध्ये ग्रंथालय आणि माहितीशास्त्र शिक्षणाविषयी उल्लेख आहे.

भारत सरकारने त्याच साली प्रा. डि.पी. चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली 'कमिटी ऑन नॅशनल पॉलिसी ऑन लायब्ररी ॲड इनफरमेशन सिस्टिम' ही स्थापन केली. या समितीने अनेक परिसंवाद, चर्चासत्रे आयोजित केली. नंतर 'नॅशनल पॉलिसी ऑन लायब्ररी ॲड इनफरमेशन सिस्टिम' हा अहवाल सादर केला. (1986) भारत सरकारने एक अधिकार समिती प्रा. डि.पी. चट्टोपाध्याय यांच्याच अध्यक्षतेखाली स्थापन केली. या समितीने 1988 मध्ये अहवाल सादर केला.

ग्रंथालय व माहिती शास्त्र सेवेमध्ये तांत्रिक क्रांतीमुळे जलदगतीने होणारे बदल लक्षात घेता कर्मचाऱ्यांना नियोजित विकास करणे आवश्यक ठरते. विद्यापीठे व तत्सम संस्थांनी पदव्युत्तर स्तरावरील ग्रंथालय व माहिती शास्त्राचा अभ्यासक्रम सुरू करणे, या अभ्यासक्रमात गुणवत्ता व अद्ययावत तंत्रज्ञानाचा समावेश करणे, ग्रंथपालन व्यावसायिकांना त्यांचे ज्ञान अद्ययावत करण्यासाठी निरंतर शिक्षण द्वारा सुविधा देणे, या अभ्यासक्रमाचे मूल्यांकन करणारी एखादी संस्था असणे, ग्रंथालय व माहिती शास्त्रातील उच्च शिक्षण व संशोधन यासाठी नॅशनल सेंटरची आवश्यकता. इत्यादी गोश्टींचा यामध्ये समावेश होता.

इ.स. 1990 साली विद्यापीठ अनुदान मंडळाने करिक्युलम डेव्हलपमेंट कमिटी स्थापन केली. त्यामध्ये ग्रंथालये ही माहिती केंद्रे म्हणून ओळखली जावीत. ग्रंथालय आणि इतर विभाग आधुनिक तंत्रज्ञानाने एकमेकांशी जोडले जावेत. संगणकीय शोध, प्रलेखन सेवा या बाबतीत ग्रंथालयीन सेवेचे विस्तारीकरण इत्यादी सूचना सूचविल्या आहेत. कारण माहिती विस्फोट झाल्यामुळे संगणकीय शिक्षण आवश्यक ठरले. ग्रंथालय व माहिती शास्त्र अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय पातळीवरून अनेक प्रयत्न करण्यात आले. समाजाला माहिती केंद्रे, ग्रंथपाल यांची उपयुक्तता पटू लागली. डॉ. एस.आर. रंगनाथन यांनी ग्रंथपालन या व्यवसायाला प्रतिश्ठा मिळवून देण्यासाठी केलेले अविश्रांत परिश्रम, शिक्षणाचा प्रसार, विद्यापीठ अनुदान, मंडळाचा अनुकूल दृष्टिकोन, संशोधनाच्या वाढत्या कक्षा, माहितीचा प्रचंड प्रमाणात होणारी निर्मिती, आधुनिक तंत्रज्ञान, संगणकीय वापर यामुळे या क्षेत्रातील कर्मचारी वर्ग हा प्रशिक्षित होणे जरूरीचे आहे.

### *संदर्भसूची :*

1) नरगुंदे, रेवती : प्रलेखन आणि माहितीशास्त्र, युनिर्व्हसल प्रकाशन, पुणे, पुंनमुद्रण 2010

2) थोरात, लक्ष्मण : ग्रंथालय माहितीशास्त्र, डायमंड प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती 2007

3) कुमार, डॉ. पी.एस.जी. : माहितीयुग, ग्रंथालय प्रतिश्ठान, नागपुर, 1, 2007, 3, 2007

**Please cite this Article as:** *दामोधर राऊत, भारतातील ग्रंथालय व माहितीशास्त्राचा इतिहास* **: Indian Streams Research Journal (March ; 2012)**